# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/12/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन रामटेकची कारवाई

दिनांक २५/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ रामटेक हद्‌दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे रामटेक हद्‌दीतील मौजा सोनेघाट शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रकव्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ यांनी घटनास्थळी नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम. एच.– ४०/ बी एल– ७७७९ चा चालक आरोपी क्र. १) नामे– नरेंद्र चंद्रभान हजारे रा. माहुली ता. रामटेक हा ट्रकमध्ये रेती वाहतुक करीत असतांना त्यास रेती वाहतुकीचा परवाना विचारला असता तारीख संपलेली परवाना दिल्याने सदर ट्रकचा मालक क्र. २) नामे– अतुल पांडुरंग काळे, रा. इटगांव ता. पारशिवनी जि. नागपुर व चालक हे अवैधरीत्या बिना रॉयल्टी रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून ट्रक क्र. एम. एच.– ४०/बी एल– ७७७९ मध्ये १२ ब्रास रेती किंमती ३६०००/– रूपये व ट्रक किंमती २०,००,०००/– रू चा असा एकुण २०,३६,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– सपोनि किशोरकुमार जगदीश वैरागडे, एस. डी. पी. ओ. कार्यालय रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर